

गुढीपाडवा हा आशेचा आणि सकारात्मकतेचा सण! तुम्हाला आणि तुमच्या कुटुंबाला भरभराट आणि सुख-समृद्धी लाभो. गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा!

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 226 ■ रविवार, दि. 30 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




तुमच्या आया-बहिणींचा व्हिडीओ पाहा, लिंक मागायचे बंद करा, माणूस बना; कथित व्हिडीओ लीक प्रकरणावरुन दाक्षिणात्य अभिनेत्री भडकली

आतील पान

# येत्या दोन वर्षात तुळजापूरचा कायापालट

## आराखड्यातील महत्वाच्या कामांना तातडीने निधी; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

दैनिक आपला विदर्भ

**धाराशिव/प्रतिनिधी : तुळजापूर विकास आराखड्याला शासनाने तत्वत: मान्यता दिली असून यातील महत्त्वाच्या कामांना तातडीने निधी वितरीत करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. आराखड्यातील कामांमुळे येत्या दोन वर्षात तुळजापूरचा कायापालट झालेला दिसेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.**





मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तुळजापूर येथे श्री. तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले. त्यानंतर मंदिर संस्थानच्या प्रशासकीय इमारतीतील सभागृहात मुख्यमंत्र्यांसमोर तुळजापूर विकास आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी मित्राचे उपाध्यक्ष तथा मंदिर संस्थानचे विश्र्वस्त आमदार राणा जगजितसिंह पाटील, आमदार अभिमन्यू पवार, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ.श्रीकर परदेशी, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, छत्रपती संभाजीनगरचे विशेष पोलिस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी, मंदिर संस्थानचे पदाधिकारी उपस्थित होते.

सादरीकरणादरम्यान जिल्हाधिकारी श्री. पूजार यांनी विकास आराखडा राबवताना एकूण ७३ एकर भूसंपादनाची गरज असल्याचे तसेच मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समितीच्या बैठकीत तुळजापूर विकास आराखड्यासाठी १८६६ कोटी रूपयांचा आराखडा मंजूर करण्यात आल्याची माहिती दिली. त्यावर बोलताना मुख्यमंत्र्यांनी भूसंपादनाच्या कामाला वेग द्यावा अशी सूचना जिल्हा प्रशासनाला केली. यामुळे आराखड्यातील कामांनाही गती मिळणार असल्याचे ते म्हणाले.

आराखड्यातील महत्त्वाच्या बाबी

तुळजापूरला जागतिक दर्जाचे धार्मिक आणि सांस्कृतिक पर्यटनस्थळ म्हणून ओळख मिळवून देण्यासाठी स्थानिक नागरिकांचा सहभाग घेत शाश्र्वत विकास करण्यासाठी तुळजापूर विकास आराखड्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. भाविकांचा त्रास कमी करून त्यांना श्री तुळजाभवानी देवीचे सुलभ व जलद दर्शन मिळावे, सध्याच्या पायाभूत सुविधांचा दर्जात्मक विकास करून नवीन पायाभूत सोयीसुविधांची निर्मिती करण्याचे काम या आराखड्याच्या अंमलबजावणीतून होणार असल्याचेही जिल्हाधिकारी म्हणाले.

मंदिराचा इतिहास, संस्कृती, वारसा आणि आध्यात्मिक मांगल्याची जपणूक यात होणार आहे.गर्दीचे नियोजन करताना स्मार्ट क्यू सिस्टीम, ऑनलाईन दर्शन व्यवस्था, भाविकांच्या संख्येचे नियमन, रस्त्यांचे रुंदीकरण, वैकल्पिक मार्ग तयार करणे, नवीन पार्किंग व्यवस्था, वाहन पार्किंगपासून मंदिरापर्यंतची वाहतूक सेवा, शौचालयांची संख्या वाढवणे, कचरा वर्गीकरण, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, प्राथमिक आरोग्य सुविधांचा विस्तार, विश्रांती स्थळे, भाविक सुविधा केंद्राची उभारणी, वॉटर कुलर व आरामदायक शौचालयाची सुविधा, सूचना व मार्गदर्शन करण्यासाठी डिजिटल पद्धती (प) चा वापर अशा काही सुधारणा या आराखड्यात समाविष्ट आहेत.मंदिर परिसरात मंदिर परिसीमा वाढवणे,मंदिर शिखर संवर्धन, कुंड, तीर्थ सुधारणा व संवर्धन, इतर मंदिर संवर्धन,विद्युतीकरण, पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन, सुरक्षा व टेहळणी व्यवस्था, वातानुकूलन यंत्रणा इत्यादीचा समावेश आराखड्यात असल्याची माहिती जिल्हाधिकारी यांनी मुख्यमंत्री यांना दिली.

तुळजापूर हेरिटेज टूर

आराखड्यात तुळजापूर हेरिटेज टूर विकसित करण्याचे प्रस्तावित असल्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. यामध्ये अष्टतीर्थ भेट व दर्शन, मुख्य मंदिर भेट व दर्शन, रामदरा तलावाच्या डोंगरावर श्री तुळजाभवानी देवी यांच्याकडून छत्रपती शिवाजी महाराजांना आशीर्वाद रूपात भवानी तलवार देतानाचे १०८ फूट उंचीचे भव्य शिल्प व शिव उद्यान, उद्यानात लाइट अँड साऊंड शो,रामदरा तलावात बोटिंगची सुविधा आदी बाबींचा समावेश आहे. मंदिर संस्थानचे विश्वस्त आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी यावेळी मुख्यमंत्र्यांच्या अपेक्षेनुसार आराखड्यातील कामे दोन वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे सांगतांना त्यांनी मुख्यमंत्री यांचे आभारही मानले.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री तुळजाभवानी देवीचे घेतले दर्शन



दैनिक आपला विदर्भ

धाराशिव/प्रतिनिधी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज श्री क्षेत्र तुळजापूर येथे महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई श्री तुळजाभवानी देवीची विधिवत पुजा करून दर्शन घेतले. यावेळी मंदिर प्रशासनाच्यावतीने जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी कवड्याची माळ घालून स्वागत केले. श्री फडणवीस यांनी यावेळी भवानी शंकराचे दर्शन घेतले. तुळजाभवानी मंदिर जीर्णोद्धार व ऐतिहासिक स्तंभ कलाकृतीचे अनावरण केले.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या समवेत मित्राचे उपाध्यक्ष तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार राणा जगजितसिंह पाटील, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाकघोष व पोलीस अधीक्षक संजय जाधव उपस्थित होते.

श्री.फडणवीस यांनी मंदिर परिसरात पुरातत्व विभागाकडून सुरू असलेल्या कामांची पाहणी केली. तसेच मंदिराच्या छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वाराची पाहणी केली व उपस्थितांशी संवाद साधला.

## उशिरा का होईना आता सगळ्यांना कळू लागले की हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराची शिवसेना कोणाची आहे- सामंत



दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी :** उशिरा का होईना आता सगळ्यांना कळू लागले की हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराची शिवसेना कोणाची आहे.. त्यामुळे आता हळूहळू सगळेच एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करत आहेत. अस मत उद्योग मंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केल आहे. ते सांगलीच्या तासगाव मध्ये बोलत होते.

वाघ्या कुत्र्याच्या स्मारक आणि शिवाजी महाराजांच्या अपूर्ण स्मारकाबाबत आपण बोलणं उचित नाही. संभाजी महाराज आणि उदयनराजे यांनी मुख्यमंत्र्यांकडे आपली भूमिका मांडली आहे. पत्र ही दिले आहे,याबाबत मुख्यमंत्री आणि दोन्ही मुख्यमंत्री निर्णय घेतील अशी भूमिका उद्योग मंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केली आहे.

उबाठा शिवसेनेचे अनेक पदाधिकारी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेमध्ये येत आहेत. सांगली मध्ये देखील आपल्याला परिस्थिती माहीत असेल त्यामुळे आता भिंग घेऊन उबाठा पदाधिकाऱ्यांना शोधावं लागत आहे,असा टोला उदय सामंत यांनी उद्धव ठाकरे शिवसेनेला लागवला आहे.

## मी नाशिकचा पालकमंत्री असलो तर अधिक गती त्या ठिकाणी देता येईल : मंत्री गिरीश महाजन यांची प्रतिक्रिया

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** मी नाशिकचा पालकमंत्री असलो तर, कुंभमेळ्याच्या कामाला अधिक गती देता येईल.असे मत मंत्री गिरीश महाजन यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.



यावेळी ते म्हणाले की, कुंभमेळा मंत्री आहे, जलसंपदा मंत्री आहे, दोन्ही कामांची जबाबदारी माझ्याकडे आहे. तसेच आपत्ती व्यवस्थापनाची जबाबदारी सुध्दा माझ्याकडे आहे. पालकमंत्री अजून जाहीर झालेला आहे, ते जेव्हा होईल, तेव्हा ते सुध्दा काम त्यावेळेला सुरु होईल, नाशिकला पालकमंत्री म्हणून आम्हाला नियुक्त केलं होते, मात्र त्यावर आता स्टे आला आहे.मुख्यमंत्री परवा नाशिकला म्हणाले की, लवकरात लवकर आम्ही जाहीर करु, जे व्हायचे ते लवकरात होईल, मी होईल अस मी म्हटलेला नाही. कुंभमेळा आहे, म्हणून मी जर त्या ठिकाणी पालकमंत्री असलो तर, अधिक गती त्याठिकाणी देता येईल असे माझे म्हणणे होते. गेल्या वेळी कुंभमेळा मंत्री सुध्दा होतो आणि पालकमंत्री सुध्दा होतो. त्यामुळे कोऑर्डीनेशन चांगल होवू शकते, एकढेच माझे म्हणणे आहे. एकनाथ खडसे यांचे कोणत्या मंत्र्याने काम केलं नाही, हे मला माहिती नाही. त्यांचे फक्त एवढेच म्हणणे आहे की, जमीनीचे भाव वाढवा, तीकडे संपादीत होत असलेल्या जमीनीसाठी, हा त्यांचा वैयक्तिक आहे. स्वत: वर्षभरापूर्वी त्यांनी जमीन खरेदी केलेली आहे, तिकडे भाव वाढवून द्या, अशी त्यांची मागणी आहे. त्याशिवाय त्यांचा दुसरा काही प्रश्न्न दिसत नाही.

जिल्ह्यात अमळनेर शैक्षणिक घोटाळा झाला आहे.मागच्या काळात निश्र्चीत घोळ झालेला आहे, हे उघड सुध्दा झालेल आहे, त्याच्या चौकशीचे करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी त्या खात्याला दिले आहेत. त्यानंतर किती घोळ आहे समोर येईल, सखोल आणि कडक चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहे. अशी माहिती मंत्री गिरीश महाजन यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

## कॉंग्रेस प्रवक्ते अतुल लोंढेंवर मानहानीचा गुन्हा दाखल; प्रशांत कोरटकर प्रकारणी मुख्यमंत्र्यांवरील टीकेवरुन भाजप आक्रमक

**नागपूर/प्रतिनिधी :** कॉंग्रेस प्रवक्ते अतुल लोंढे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांविरोधात केलेल्या आरोपांवरुन भाजपने आक्रमक पवित्रा घेत नागपूरच्या गणेशपेठ पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविली आहे. अतुल लोंढे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. कॉंग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी बोलताना प्रशांत कोरटकर प्रकरणात त्याला मदत करणारा प्रशिक पडवेकर हा मुख्यमंत्री कार्यालयात काम करणारा व्यक्ती आहे का? असा प्रश्न उपस्थित करत भाजप ने खुलासा करावा, अशी मागणी केली होती. याच आरोपावर नागपुरातील भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी आक्रमक पवित्रा घेत नागपूरच्या गणेशपेठ पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविली होती.

दरम्यान, आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करणे कॉंग्रेस प्रवक्ते अतुल लोंढे यांना महागात पडले आहे. या प्रकरणी अतुल लोंढेंवर मानहानीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रशांत कोरटकरसोबत तोलंगाणातून अटक केलेला प्रतिक पडवेकर हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयातील कर्मचारी आहे, मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात खुलासा करावा अशी मागणी कॉंग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केली होती. त्यानंतर भारतीय जनता पक्ष आक्रमक झाला आणि शहर अध्यक्ष बंटी कुकडे यांच्या वतीने गणेशपेठ पोलीसठाण्यात अतुल लोंढेच्या विरोधात तक्रार देण्यात आली. त्यानंतर रात्री उशिरा भाजपच्या शिष्टमंडळाने गणेश पेठ पोलीस स्टेशन मध्ये दाखल होत अतुल लोंढे यांनी केलेले आरोप बिनबुडाचे आणि मुख्यमंत्र्यांची बदनामी करणारे आहेत, असा आरोप केला. यावेळी भाजपचे नागपूर शहर अध्यक्ष बंटी कुकडे यांच्यासह पूर्व नागपूरचे आमदार कृष्णा खोपडे, मध्य नागपूरचे प्रवीण दटके ही उपस्थित होते.

## उल्हासनगरमध्ये गांजा तस्करीचा पर्दाफाश, एकाला अटक

दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** उल्हासनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांच्या विशेष पथकाने गांजा तस्करीचा पर्दाफाश करून एका आरोपीला अटक केली आहे. गुलशन नगर आयडिया घाट परिसरात मोहन लासी नावाचा व्यक्ती गांजा विकण्यासाठी जात असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. माहितीच्या आधारे पोलीस अधिकारी लहू सातपुते यांच्या नेतृत्वाखालील पथकाने घटनास्थळी सापळा रचून आरोपीला अटक केली. झडतीदरम्यान आरोपींकडून ४ किलो ३४२ ग्रॅम गांजा, एक मोटारसायकल आणि ओप्पो कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आला.

जप्त केलेल्या गांजाची किंमत अंदाजे ८६,८४० रुपये, मोटरसायकलची किंमत ५०,००० रुपये आणि मोबाईलची अंदाजे किंमत १०,००० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. एकूण १,४६,८४० रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे. मोहन परशुराम हेमवानी (४८) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे, तो उल्हासनगर येथील बॅरेक क्रमांक ३४२, शिरू चौक, कॅम्प क्रमांक २ येथे राहतो. पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विष्णू ताम्हाणे यांनी सांगितले की, आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून




पुढील कारवाई सुरू करण्यात आली आहे.

## भारताने केलेले उपकार बांगलादेश विसरला

१९७१ पर्यंत बांगलादेश हा पाकिस्तानचा एक भाग होता. तेंव्हा त्याला पूर्व पाकिस्तान असे म्हंटले जायचे. पाकिस्तानच्या राजवटीत बांगलादेशातील नागरिकांवर अनन्वित अत्याचार होत होते. बांगलादेश हा पाकिस्तानचा घटक असूनही बांगलादेशी नागरिकांवर पाकिस्तान जुलुम करत होता. पाकिस्तानच्या जुलमी राजवटीला कंटाळून बांगलादेशचे तात्कालिन नेते शेख मुजिबिर रहेमान यांनी पाकिस्तानी सरकार विरुद्ध बंड पुकारले. त्यांच्या या बंडास बांगलादेशी नागरिकांनी प्रतिसाद दिला आणि लोक रस्त्यांवर उतरले मात्र पाकिस्तानने दडपशाही मार्गाने हे आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला तेंव्हा शेख मुजीबिर रेहमान यांनी भारताच्या तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याकडे मदतीची याचना केली. इंदिरा गांधी यांनी तत्काळ बांगलादेशी नागरिकांना पाठिंबा दिला आणि भारतीय लष्कराने पाकिस्तानशी मुकाबला करून बांगलादेशला पाकिस्तानच्या गुलामीतून मुक्त केले. पाकिस्तानच्या निर्मितीत भारताचा मोठा वाटा आहे नव्हे भारतामुळेच बांगलादेशची निर्मिती झाली आहे. पाकिस्तानच्या जुलमी राजवटीतून मुक्त झाल्या पासून बांगलादेश आणि भारताचे संबंध मैत्रीचेच राहिले आहेत. मोठ्या भावाच्या रुपात भारताने बांगलादेशला नेहमीच त्यांच्या संकटात मदत केली मात्र आता परिस्थिती बदलली आहे. बांगलादेश मधील सध्याचे सरकार आणि बांगलादेशी नागरिक भारताच्या उपकाराला विसरली असून भारतालाच शत्रू मानू लागली आहेत. बांगलादेशात सध्या भारता विरुद्ध मोठा जनक्षोभ पाहायला मिळत आहे. बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांचे सरकार पाडून तेथील कट्टरपंथीयांनी सत्ता हस्तगत केली. कट्टरपंथीय, लष्कर आणि जनतेचा रोष पाहून शेख हसीना यांनी भारतात पलायन केले. शेख हसीना यांचे भारताशी सौहार्दाचे संबंध होते म्हणूनच भारताने त्यांना भारतात आश्रय दिला कदाचित हेच तेथील नवनियुक्त सरकारला आणि कट्टरपंथीयांना रुचले नसावे म्हणूनच त्यांनी बांगलादेशातील हिंदू अल्पसंख्यांक नागरिकांना लक्ष करण्यास सुरुवात केले. गेल्या काही महिन्यात बांगलादेशातील हिंदू मंदिरांवर आणि हिंदू नागरिकांवर हल्ले होऊ लागले. मागील काही महिन्यात बांगलादेशात हिंदूवरील हल्लूयाच्या ३०० घटना घडल्या आहेत. यात काही नागरिकांना जीव देखील गमवावा लागला आहे. हिंदूंच्या मंदिरांवर आणि घरांवर जाणीवपूर्वक हल्ले केले जात आहेत. हिंदूंनी बांगलादेश सोडून जावे असे जाहीरपणे इशारे दिले जात आहेत. या कट्टरपंथीय हल्लेखोरांना रोखण्यात तेथील डॉ मोहंमद युनूस यांचे सरकार अपयशी ठरत आहे किंबहुना या हल्लेखोरांना तेच पाठीशी घालत आहेत. बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदूंचे संरक्षण करणे हे तेथील सरकारचे कर्तव्यच आहे मात्र आपले कर्तव्य विसरून तेथील सरकार कट्टरपंथीयांना मोकळीक देत आहे. इतकेच नाही तर बांगलादेशात भारत विरोधी वातावरण निर्माण व्हावे यासाठी प्रयत्न करत आहे. डॉ मोहंमद युनूस हे नोबेल पारितोषिक विजेते आहेत. त्यांची बांगलादेशचा हंगामी पंतप्रधानपदी निवड झाल्यावर भारताने त्याचे स्वागत केले होते. त्यांच्याकडून न्याय आणि समानतेची अपेक्षा होती मात्र आता ती अपेक्षा फोल ठरली. त्यांच्या कारकीर्दीत भारत आणि बांगलादेश यांच्यात मैत्रीचे संबंध प्रस्थापित होतील असे वाटले होते पण त्यांनी मात्र भारताशी पंगा घेण्याचेच ठरवले आहे. भारताने केलेले उपकार बांगलादेश आता विसरला आहे म्हणूनच भारताच्या पंतप्रधानांना त्याची पुन्हा आठवण करून द्यावी लागली.२६ मार्च १९७१ रोजी बांगलादेशची निर्मिती झाली. या घटनेला यावर्षी ५५ वर्ष पूर्ण झाली. बांगलादेशात त्यांचा स्थापना दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यावर्षी ही तो तसा साजरा करण्यात आला. दरवर्षी बांगलादेश स्थापना दिनी बांगलादेशचे पंतप्रधान देशवासीयांना स्थापना दिनाच्या शुभेच्छा देताना बांगलादेश निर्मितीत भारताने केलेल्या मदतीचे स्मरण करून भारताचे आभार मानतात मात्र यावेळी प्रथमच बांगलादेशने भारताचे आभार मानले नाही इतकेच नाही तर बांगलादेश निर्मितीत भारताने दिलेल्या योगदानाची साधी दखलही घेतली नाही. हे पहिल्यांदाच घडले आहे म्हणूनच भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बांगलादेश सरकारचे हंगामी पंतप्रधान डॉ. मोहंमद युनूस यांना शुभेच्छा पत्र पाठवून स्मरण करून दिले की १९७१ च्या मुक्ती संग्रामामुळे भारत आणि बांगलादेश दरम्यान नवीन संबंधांना सुरुवात झाली आहे हा दिवस दोन्ही देशांच्या भागीदारी आणि त्याग यांची आठवण करून देतो. आम्ही दोन्ही देशांमधील हे संबंध आणखी दृढ करण्यासाठी वचनबध्द आहोत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या पत्रातून बांगलादेशला शालजोडीतून मारतानाच भारताने बांगलादेश निर्मितीत केलेल्या मदतीची आठवण करून दिली आहे अर्थात या पत्रातून बोध घेऊन तरी बांगलादेशने आपल्या वर्तणुकीत बदल करायला हवा. भारताशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित होणे हे बांगलादेशच्याच हिताचे आहे. पाकिस्तान आणि बांगलादेशच्या नादी लागून भारताशी वैर पत्करणे म्हणजे स्वतःच स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेणे हे बांगलादेश ने लवकरात लवकर समजून घ्यायला हवे कारण पाकिस्तान आणि चीन हे कधीही कोणाचे मित्र होऊ शकत नाही. जिथे फायदा तिथेच मैत्री असे या दोन्ही देशांचे धोरण आहे. आशिया खंडातील भारतचे वर्चस्व कमी करण्यासाठी हे दोन देश बांगलादेशचा वापर करून घेत आहेत. उद्या यांची गरज संपली की हे देश बांगलादेशला वाऱ्यावर सोडून देतील तेंव्हा बांगलादेशची अवस्था ना घर का ना घाट का अशी होईल. त्यामुळे बांगलादेशने आताच सावध होऊन भारताशी पुन्हा मैत्रीचे संबंध प्रस्थपित करायला हवे.

# मेहकर तालुक्यातील एन ए घोटाळा प्रशासनाच्या रडारवर

## ४९ जणांना नोटीस : बडे मासे गळाला लागण्याची शक्यता


### मेहकर तालुक्यात लेआउटचा सावळा गोंधळ

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी : घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी नागरिक संपूर्ण आयुष्य पदरमोड करून पै-पै जमा करतो. जमा झाल्यातून पैशातून छोटेसे टुमदार घराचे स्वप्न पाहतो. मात्र नागरिकांच्या या स्वप्न वर घाला घालीत विनापरवाना लेआउट मेहकर तालुक्यातील वासीयांच्या माथी मारले जात आहे. याबाबत अनेक तक्रारी सुद्धा झाल्याच्या ही सूत्रांची माहिती आहे.असे असतानाही सर्वसामान्य जनतेला फसविणाऱ्या लेआउट मालकावर अद्याप कारवाई झाली नसल्याने यामध्ये कोठे पाणी मुरले असा प्रश्न जनता उपस्थित करीत आहे.**

नगर रचना विभागाच्या परवानगी विना लेआऊट

संग्रहीत छायाचित्र

भाग ०१

मेहकर येथे अनेक भागात लेआउट पडले आहेत. अवाच्या सव्वा दराने सर्वसामान्य जनतेच्या माथी या लेआउट मधील प्लॉट विक्री करून मारले जात आहे. प्लॉट पाडण्यासाठी व कायदेशीर रित्या विक्री करण्यासाठी लेआउट करताना नगररचना विभागाची परवानगी आवश्यक आहे. मात्र, येथील लेआउट मालकांनी नगररचना विभागाची परवानगी न घेताच प्लॉट विक्रीचा गोरख धंदा सुरू केलेला आहे. नगर रचना विभागाअंतर्गत परवानगी घेताना रस्ते, ओपन पेस, म्युनिटी आदी अनेक प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असते. मात्र, या सर्व नगररचना विभागाचा वॉच राहतो. मात्र, या सर्व नियमाला बगल देत येथील लेआउट मालकांनी तालुक्यातील वासीयांच्या माथी विनापरवाना व कोणत्याही सोयी सुविधा उपलब्ध न करता प्लॉट विक्री करून फसवणूक केली असल्याचा प्रकार समोर आला आहे. याबाबत मेकर तालुक्यातील अनेक नागरिकांनी तक्रारी केलेल्या आहेत. मात्र, त्याचबरोबर लोकप्रतिनिधींनी याबाबत चुप्पी साधल्याने सर्वसामान्य जनतेचा कोणी वाली नसल्याचे चित्र दिसून आले आहे.गोरगरीब जनतेची फसवणूक करणाऱ्या व विना परवाना लेआउट पाडून त्यातील प्लॉट सर्वसामान्य जनतेला विक्री करणाऱ्या लेआउट मालकावर कारवाई करावी, अशी मागणी जनतेकडून होत आहे. तूर्तास एवढे सविस्तर पुढील भागात

देविदास खनपटे
मुख्य संपादक




दैनिक आपला विदर्भ

**मेहकर : शहरातील भूखंड विक्री आणि जमिनींचे अकृषिक रूपांतरण प्रक्रियेत मोठा घोटाळा झाल्याचे वृत्त दैनिक आपला विदर्भ मेहकर तालुक्यात भूखंड विक्रीचा सावळा गोंधळ या मथळ्याखाली प्रकाशित करून हे प्रकरण चव्हाट्यावर आणले होते. सदर प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी उपविभागीय अधिकारी यांना भूखंड विक्री करणा ऱ्यांना नोटीस बजावण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी यांनी भूखंडाची गैर मार्गाने विक्री करणाऱ्या तब्बल ४९ जणांना नोटीस बजावली आहे. यामध्ये अनेक मोठ्या व्यक्तींची नावे असून, या घोटाळ्यात आणखी काही जणांची नावे समोर येण्याची शक्यता आहे. दैनिक आपला विदर्भाने तालुक्यातील भूखंड विक्री मधील गैरप्रकारा मध्ये वृत्त प्रकाशित करून सदर प्रकरण चव्हाट्यावर आणल्याने गोरगरिबांची आर्थिक लूट करणाऱ्या भूखंड विक्रेत्यांचे मात्र, धाबे दणाणले आहेत.**

मेहकर तालुक्यात तत्कालीन उपविभागीय अधिकारी गणेश राठोड यांच्या कार्यकाळात अकृषिक जमिनीच्या मंजुरी प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचे निष्पन्न झाले आहे. नगररचना कार्यालयाची कुठलीही परवानगी नसताना आणि आवश्यक अहवाल प्राप्त नसतानादेखील अनेक ले-आउट मंजूर केले. यामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडाला तर भूखंड खरेदी करणारे गोरगरीब जनतेचे फसवणूक झाल्याचा प्रकार उघड झाला. याबाबत दैनिक आपला विदर्भने वृत्त प्रकाशित करून सदर प्रकरण चव्हाट्यावर आणले. एसडीओ रवींद्र जोगी यांनी बजावलेल्या नोटिशीत स्पष्ट केल्याप्रमाणे नियमबाह्य पद्धतीने एन.ए. मंजुरी घेणाऱ्या ४९ जणांना कागदपत्रांसह स्पष्टीकरण देण्यासाठी नोटीस बजावली आहे. अनेक ले-आउट धारकांनी नियम धाब्यावर बसवून प्लॉट विक्री केली आहे. यामुळे अनेक प्लॉटधारक चिंतेत असून, घेतलेल्या भूखंडाचे काय होणार यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याप्रकरणी तत्कालीन एसडीओ गणेश राठोड यांची चौकशी होणार असल्याचे संकेत आहेत. खातेनिहाय चौकशी सुरू होणार असून, डीई (अए) ओपन करण्याचा प्रस्ताव प्रलंबित आहे. यामुळे या घोटाळ्यातील आणखी नावे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

### ४९ जणांना नोटीस इतरही बडे मासे गळाला लागण्याची शक्यता

भूखंड विक्री घोटाळा प्रकरणी उपविभागीय अधिकारी यांनी ४९ जणांना नोटीस बजावली आहे. यामध्ये प्रशांत गोविंद सावजी व इतर, कन्हैयालाल शिवराम मेहकरकर, कैलास चनखोरे, शिवशंकर चनखोरे, विलास चनखोरे, सौ. छाया चनखोरे, तुषार दिपक नेमाडे व इतर, विकी शिवराम नायर, रुपाली मनोज जाधव व इतर राम गणेशराव गिते व इतर भास्कर सुखदेव धुदाट, भास्कर सुखदेव धुदाट, दशरथ कुंडलिक पोपळघट, तुकड़ेबि ज. अब्दुल हबीब, गजानन इनकर, नारायण नथ्थुजी नागोलकर, दिपक बद्रिनारायण आग्रवाल व इतर लक्ष्मण तुकाराम पोपळघट, आकांशा निखील महाजन, सुनिता काळे, सुजाता प्रशांत सावजी, गोपाल प्रल्हाद ठाकरे, वैभव दिलीप वाघ, नवोदय शिक्षण संस्था, वैभव रविंद्र इंगळे, अब्दुल हक वहीद, शे. जुनेद शे. मसुद, गजानन भगवान इनकर, रऊफ शहा अब्दुल शहा, मयुरा अंकूश आलेगावकर, लता विजय आव्हाळे व इतर, शे. बशीर शे. करीम व इतर सुरेश अर्जुन चोपडे, गजानन इनकर, डॉ. सोनल आशिष लोहीया व इतर, विष्णू किसन बाजड, अब्दुल हक वहीद, संतोष भगवान रनमाळे, विकी शिवराम नायर, शे. चाद शे. महेबुब, अभिलाश गजानन व्यवहारे, रामभाऊ विठोबा जाधव गजानन काशीराम ठाकरे, चंद्रशेखर नागनाथ जोशी, रुपाली विकी नाईक, विलास सुदाम दुधाट, विजय भिमराव आव्हाळे, वैभव गिरीष उमाळकर, काशिराम पुंडलिक ठाकरे, अशोक रामभाऊ रायते, विजय भीमराव आव्हाळे, रमेश गिनाजी धोंडगे यांचा समावेश आहे.जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार पुढील काही दिवसांत या प्रकरणाचा पुनर्विलोकन अहवाल तयार करण्यात येणार आहे. तसेच, बोगस (NA) मंजुरी रद्द होण्याची शक्यता असून, संपूर्ण घोटाळ्याची चौकशी होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

## तुमच्या आया-बहिणींचा व्हिडीओ पाहा, लिंक मागायचे बंद करा, माणूस बना; कथित व्हिडीओ लीक प्रकरणावरुन दाक्षिणात्य अभिनेत्री भडकली



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** दाक्षिणात्य अभिनेत्री श्रुती नारायणन हिचा कथित कास्टिंग काऊच व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झालाय. दरम्यान, या व्हायरल व्हिडीओवरुन श्रुती चांगलीच भडकलेली पाहायला मिळालाये. ज्यांनी हा व्हिडीओ शेअर केलाय, त्या लोकांवर अभिनेत्री भडकली आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इन्स्टाग्रामवरुन श्रुतीने या लोकांवरचा राग व्यक्त केलाय.

श्रुती नारायणमने इंस्टाग्राम स्टोरीवर दोन पोस्ट केल्या होत्या ज्या आता काढून टाकण्यात आल्या आहेत. पहिल्या पोस्टमध्ये अभिनेत्रीने लिहिले होते की, 'तुम्हा लोकांसाठी, माझ्याबद्दल असं काही पसरवणं गे मजेदार वाटतं असेल. तुम्हा सर्वांना मजा येत असेल. पण माझ्यासाठी आणि माझ्या जवळच्या लोकांसाठी ही खूप कठीण परिस्थिती आहे. विशेषत: माझ्यासाठी हा खूप कठीण काळ आहे आणि तो हाताळणे कठीण आहे.

श्रुती पुढे लिहिताना म्हणाली, 'मी देखील एक मुलगी आहे आणि मलाही भावना आहेत. माझ्या जवळच्या लोकांनाही भावना आहेत आणि तुम्ही लोक ते वाईट करत आहात. माझी तुम्हा सर्वांना नम्र विनंती आहे की, सर्व काही जंगलातील वणव्यासारखे पसरवू नका. तुम च्या आई, बहिण किंवा मैत्रिणीचे व्हिडिओ पाहा कारण त्या देखील मुली आहेत आणि त्यांचेही शरीर माझ्यासारखेच आहे, त्यामुळे जा आणि त्यांच्या व्हिडिओंचा आनंद घ्या. संपूर्ण पोस्टमध्ये श्रुती नारायण तिला ट्रोल करणाऱ्या लोकांवर भडकलेली पाहायला मिळाली. तिने लिहिले की, 'हे एका व्यक्तीचे जीवन आहे, तुमचे मनोरंजन नाही. मी पीडितेला दोष देणाऱ्या अनेक टिप्पण्या आणि पोस्ट पाहिल्या आहेत. पण मला पुरुषांना विचारायचे आहे की असे का? महिलांना नेहमीच वेगळा न्याय का दिला जातो, तर असे व्हिडिओ लीक करणाऱ्या आणि पाहणाऱ्यांना कोणीही प्रश्न विचारत नाही? यावर लोक ज्या प्रकारे प्रतिक्रिया देत आहेत ते घृणास्पद आहे.

लिंक मागणे बंद करा, माणूस बनायला सुरुवात करा. सर्व महिलांचे शरीराचे अवयव सारखेच असतात, जसे की तुमची आई, आजी, बहीण किंवा पत्नी. ही काही मोठी गोष्ट नाही. हा केवळ व्हिडिओ नसून हा कोणाच्या तरी मानसिक आरोग्याचा आणि आयुष्याचा प्रश्न आहे. अख-जनरेटेड डीपफेक लोकांचे जीवन उध्वस्त करत आहेत आणि जर तुम्ही त्यांच्याशी कनेक्ट होत असाल, तर तुम्ही देखील या समस्येचा भाग आहात. शेअर करणे थांबवा, लिंक्स मागणे बंद करा. माणूस होण्यास सुरुवात करा.

# संघाचा इतिहास दोन समाजामध्ये दरी निर्माण करणारा

## आमदार विजय वडेट्टीवार यांची पत्रकार परिषदेत टिका



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** संघाचे शंभर वर्ष दोन समाजात दरी निर्माण करणारा असा इतिहास राहिला आहे. पूर्वी स्वातंत्र्य काळापूर्वी संघ आणि मुस्लिम लीग काही काळ एकत्र आले होते. अशी माहिती आमदार विजय वडेट्टीवार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी विजय वडेट्टीवार म्हणाले की, संघाची भुमिका परिस्थितीनुसार बदलली आहे. संघाचा अजेंडा विभाजनाचा आहे. काँग्रेस ची भूमिका सर्वांना सोबत घेऊन चालणारी तर संघाची विशिष्ट विचाराला घेऊन चालणारी आहे.त्यामुळे शंभर वर्ष पूर्ण होत असल्याने संघाची पुढची भूमिका बदलेल अशी अपेक्षा ठेवूया. मोदी १२ वर्षानंतर संघ मुख्यालय मध्ये येत आहेत. म्हणजे पंतप्रधानांचा प्रवास सूर्योदयापासून सूर्यास्थाकडे जातोय असे म्हणावे लागेल. ते पीएम झाल्यापासून कधीच आले नाही आता येत आहेत. त्यांच्या विजयात नरेंद्र मोदींचा करिष्मा नाही तर संघाचा करिष्मा आहे. असं पटले असेल म्हणून ते येत आहेत. राज्य कर्जबाजारी झालाय. ज्या योजना निवडणुकीच्या तोंडावर आणून अर्थव्यवस्था खिळखळी केली.आता दिलेल्या आश्र्वासनाच विसर या सरकारला झालाय. आम्ही जुमला केला आमची नियत आणि औकात नाही अस शेतकऱ्यांना सांगाव. कर्ज न फेडल्याने नवीन कर्ज मिळणार नाही.शेतकरी तुम्हाला नांगरून गाड्यात घातल्या शिवाय राहणार नाही. ओबीसीची स्कॉलरशिप बंद पडल्यास जमा आहे. ओबीसीची मते घेऊन ओबीसीच्या तरुणाच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम झाले. पैसे नसल्याने अनेक योजनांना कट लावले. भटक्या जमातीची घरकुल योजनेचे पैसे अडकले आहेत. गोपीनाथ मुंडे अपघात योजनेचे दोन वर्षापासून पैसे मिळत नाही. फक्त नावाला योजना आहे. त्यामुळे हे बंद करा. पुढील एक ते दोन वर्ष राज्याची आर्थिक स्थिती सुधारेल असं मला वाटत नाही. साधवी प्रकरणी न बोललेले बरं. एखाद्या न्यायाधीशाच्या घरात नोटा जळलेल्या मिळाल्या. चार स्तंभाची काय स्थिती आहे. आम्हाला इमर्जन्सी म्हणून हिणवत होते मात्र आता त्यापेक्षाही गंभीर स्थिती झाली आहे.व्यक्ती स्वातंत्र्य राहिला नाही. कोर्टातून कोणाच्या बाजूने कोणता निर्णय होईल हे सांगता येत आहे. न्यायव्यवस्था सत्ताधाऱ्याच्या इशाऱ्यावर चालत असल्याचा समज होत चाललाय आहे. त्यांना पुरस्कारासाठी न्यायालय मान्यता देत असेल तर देशात संविधान नाही.

लोकशाही नाही, त्यामुळे न्यायव्यवस्थेवर देशाने विश्र्वास ठेवायचा की नाही अशा वाटचालीकडे देश चालला आहे. उदयनराजे त्यांच्या मनात राग आला की ते खरं बोलतात. कोश्यारी पासून महाराजाचा अपमान करण्याची यादी काढली तर किती आणि कोणावर कारवाई झाली. महापुरुषांचा अपमान करणाऱ्यांना सरकार पाठीशी घालत आहे. असं चित्र आहे.नितेश राणे प्यारे खान तक्रार प्रकरणी पक्षाची भूमिका काय यावर सर्व आहे. नितेश राणे कोणाच्या इशाऱ्यावर बोलतात. एक व्यक्ती स्पष्ट बोलतो तेव्हा सरकारचा आशीर्वाद असल्याशिवाय बोलत नाही. त्यामुळे प्यारे खान याच्या भूमिकेला फार महत्त्व आहे असे मी मानत नाही. असे मत आमदार विजय वडेट्टीवार यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### जिल्हा नियोजनच्या १०० टक्के निधीच्या कामांचे नियोजन गुलाबराव पाटील यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ



**जळगाव/प्रतिनिधी :** पालकमंत्री ग्रामविकास योजना नावाचा प्रकल्प सुरु आहे. जिल्हा नियोजनाच्या शंभर टक्के निधीच्या कामाचे नियोजन करण्यात आले आहे अशी माहिती मंत्री गुलाबराव पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की, १७२ गावांपैकी १४२ गावांमध्ये प्रकल्पाला सुरवात करण्यात आली आहे.३७ हजार घरांकरिता वर्क ऑर्डर देण्यात आली आहे. जिल्हा नियोजन मंडळ म्हणजेच डीपीसीच्या माध्यमातून १०० टक्के निधी खर्च करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. भविष्यात कर्ज माफी होणार आहे. अशी माहिती पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

### गेल्या दहा वर्षापासून कल्याण मध्ये निवडणूका नाही - हर्षवर्धन सपकाळ



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** देशात आणि महाराष्ट्रात सध्या अपरिहार्य स्वरूपात युती आघाडी करावी लागत आहे. युती आघाडी करणे पॉलिटिकल कंपल्शन आहे. त्याचा फटका सगळ्याच पक्षांना बसत आहे. महाराष्ट्रात कधी नव्हे ते पक्ष सक्रीय झाले आहेत. निवडणूकीत सार्वत्रिक स्वरुपात आम्ही लढू शकलो नाही. ही वस्तू स्थिती आहे. आत्ता संघटन मजबूत करुन महापालिका निवडणूकीत कार्यकर्त्याला कसा न्याय दिला जाईल असे विधान कॉंग्रेस पक्षाचे प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यानी केले आहे. इतकेच नाही तर गेल्या दहा वर्षापासून निवडणूका झालेल्या नाहीत. या सरकारला निवडणूका घ्यायच्या नाहीत. सगळी सत्ता आपल्याजवळच असली पाहिजे. ही सरकारची इथल्या पालकमंत्र्यांची इच्छा आहे असे देखील विधान सपकाळ यांनी केले आहे. महायुतीला निवडणूकीत यश मिळालेल. त्यांनी जाहिरानाम्यात जी आश्र्वासने दिली होती. ती पाळत नाही. त्यापासून पळ काढत आहे अशी टिकाही त्यांनी केली आहे. कल्याणमध्ये कॉंग्रेसच्या मेळाव्यास सपकाळ हे उपस्थित होते. येणाऱ्या महापालिका निवडणूकीत पक्षाला यश कसे मिळणार याबाबत त्यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

### अवकाळी पावसामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बागायतदार हवालदिल आंबा, काजू पिकांचे मोठे नुकसान





दैनिक आपला विदर्भ

**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी :** सिंधुदुर्ग जिल्ह्यात दोन दिवसांपूर्वीच अवकाळी पाऊस झाला. तर मागील दोन दिवस ढगाळ वातावरण असून दुपारच्या वेळी उन्हाचा पारा ४० अंशावर गेला आहे. या लहरी वातावरणामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बागायतदार वर्गाचे मोठे नुकसान झाले आहे. पुढील १५ दिवसात काढणीला आलेला आंबा गळून पडत असल्याने शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. तर काजू पिकाला सुद्धा या लहरी पावसाचा फटका बसलाय. यामुळे बागायतदारांकडून नुकसान भरपाईची मागणी राज्य सरकारकडे होत आहे.



# लोणार येथील आमसभा विविध विषयावर गाजली

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**लोणार : रविवार दिनांक २८ मार्च लोणार येथील श्री मंगल कार्यालयात वार्षिक आमसभेचं आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मेहकर लोणार मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात होते तर प्रमुख उपस्थितीत सिंदखेड राजा मतदारसंघाचे आमदार मनोज कायंदे होते.**



व्यासपीठावर शिवसेना जिल्हाप्रमुख बळीराम मापारी, शिवसेना तालुकाप्रमुख भगवानराव सुलताने, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक भगवानराव कोकाटे, भाजपा तालुकाध्यक्ष भगवानराव सानप, युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष देवानंद सानप,कारभारी सानप,संजय आटोळे , उबाठा सेनेचे आशिष रहाटे, जिल्हा संघटक गोपाल बच्चीरे, पत्रकार भगवानराव नागरे,दिपक घुगे,सदानंद तेजनकर, गजानन जाधव, सुदन अंभोरे कैलास अंभोरे, बुधवत महिला आघाडी च्या वाघ मॅडम तारामती जायभाये यांच्यासह इतर पदाधिकारी व्यासपीठावर हजर होते. यावेळी लोणार तालुक्याच्या विकास कामावर चर्चा झाली अंगणवाडी निकृष्ट बांधकामा बाबत चौकशीचे आदेश दिले तर तालुक्यातील पाणी प्रश्नावर आमदार मनोज कायदे यांनी अधिकारी व ठेकेदार यांना खडेबोल सुनवत भ्रष्टाचार झाला असेल तर फौजदारी सारखे गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले व तसेच गैरहजर असलेल्या अधिकाऱ्यांना नोटीस बजावण्याचे आदेश आमदार मनोज कायदे



यांनी तहसीलदार यांना दिले मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या विविध समस्या व गावातील विकास कामे काळजीपूर्वक काम करण्यात यावे असे यावेळी आमदार खरात यांनी अधिकाऱ्यांना सांगितले . या बैठकीला सर्व विविध खात्याचे अधिकारी व कर्मचारी हजर होते. कार्यक्रमासाठी तालुक्यातील सरपंच व इतर नागरिक मोठ्या प्रमाणात हजर होते.

### राज्याला लुटण्याचे काम हे सरकार करत आहे अंबादास दानवे यांचे टीका

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** शेतकऱ्याकडे दुर्लक्ष करणे मोठ्या संकटाला सामोरे जावे लागू शकते. भाजप आणि सहकारी दोन गटांनी निवडणुकीत शेतकरी कर्जमाफीचे आश्र्वासन दिले होते. मात्र ते आश्र्वासन पूर्ण करण्यात आले नाही. राज्याला रोखण्याचे काम हे सरकार करीत आहे. अशी टीका विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी माध्यमांशी बोलताना केली. यावेळी ते म्हणाले की, आदर्श पुरस्कार प्राप्त आणि प्रगतिशील शेतकरी कैलास नांगरे यांनी आत्महत्या केली, ह्यातून सामान्य शेतकऱ्यांची काय स्तिथी आहे हे लक्षात येते. राज्याचे राज्यपाल हे छत्रपती शिवाजी महाराज यांचा अपमान करतात. सरकारला जनतेच्या प्रश्र्नांचं व समस्यांच काही देणे घेणे नाही. राज्याला लुटण्याचे काम हे सरकार करत आहे. स्वतःची खुर्ची राखण्यात भाजप जास्त इच्छुक आहे. राज ठाकरे यांनी केलेले विधान अचूक आहे.

## रिसोडमध्ये प्रथमच तारांगण निरीक्षण कार्यशाळा– एक अद्वितीय अनुभव!

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड /प्रतिनिधी :** पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, रिसोड येथील भौतिकशास्त्र विभाग, आय.क्यू.ए.सी., आणि ऍस्ट्रॉनॉमी व ऍस्ट्रॉनॉमीजिक्स सोसायटी, शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने, २८ मार्च २०२५रोजी तारांगण निरीक्षण कार्यशाळा संपन्न झाली. सदर कार्यशाळा रिसोड शहरात प्रथमच आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांमध्ये खगोलशास्त्राविषयी एक उत्सुकता व कुतूहल निर्माण करणे व संशोधन वृत्ती वाढविणे हा या कार्यशाळेचा हेतू होता. या कार्यशाळेत, विद्यार्थ्यांना ८ इंच ञ्रे-ढे टेलिस्कोप च्या सहाय्याने रात्रीचे आकाश निरीक्षण करण्याची संधी मिळाली.या टेलिस्कोपने विद्यार्थ्यांना गुरू ग्रह आणि त्याचे चंद्र, मंगळ ग्रह आणि नक्षत्रांचे निरीक्षण करण्यात मदत केली. कार्यशाळेची प्रस्तावना



भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. जितेंद्र बोरसे यांनी केली. विद्यार्थ्यांना खगोलशास्त्रज्ञ डॉ. दीपक झटाले यांनी खगोलीय घटकांची ओळख करून दिली व शास्त्रीय महत्व स्पष्ट केले. त्याचबरोबर टेलिस्कोपला हाताळण्याची माहिती दिली.

तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी खगोलशास्त्रातील महत्त्वाच्या गोष्टी सोप्या पद्धतीने समजावून सांगितल्या. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि उत्सुकता वाढवली आहे. विद्यार्थ्यांना स्पेस सायन्स क्षेत्रातील करिअर संधींबद्दल मार्गदर्शन केले. खगोलशास्त्राचा अनुभव घेण्यासाठी या कार्यशाळेच्या पुढील आवृत्त्यांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

डॉ. झटाले सोबत आलेले सहकारी श्री. जयेश वरघट आणि श्री. दुर्गेश सपकाळ यांनी टेलिस्कोप सेटअप आणि त्याच्या कार्यप्रणालीचा प्रत्यक्ष प्रदर्शन करून विद्यार्थ्यांना त्याचा उपयोग कसा करायचा याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव मा.अमितभाऊ पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. एन. गायकवाड, डॉ. ए. डी. बदर, प्रा. भुषण सावळे उपस्थित होते. कार्यशाळेला रिसोड येथील विद्यार्थी, शिक्षक व पालक बहुसंख्येने उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ.सिद्धार्थ इंगोले यांनी तर आभार प्रदर्शन श्री.निखिल उंबरकर केले.

## रिसोड तालुका रोजगार सहाय्यक संघटनेचे काम बंद आंदोलनाचे निवेदन



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** तालुका ग्रामरोजगार सहायक संघटनेचे एक एप्रिल २०२५ पासून काम बंद आंदोलनाचे निवेदन सादर करण्यात आले असून रिसोड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.

दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ रोजी नियोजन (रोहयो) विभागाच्या वतीने मानधनाचा शासन निर्णय झाला, परंतु त्याची अंमलबजावणी अद्यापही झाली नाही ,तब्बल सहा महिन्यापासून महाराष्ट्रातील रोजगार सहायकांना मानधन मिळालेले नाही, त्यामुळे महाराष्ट्र शासनाने या बाबीची गंभीर दखल घेऊन महाराष्ट्रातील ग्रामरोजगार सहायकांनी संदर्भीय शासन निर्णयानुसार आठ हजार रुपये फिक्स मानधन तात्काळ वैयक्तीक खात्यात अदा करण्यात करण्यात यावे तसेच,दोन हजार रुपये प्रवास भत्ता व इतर बाबींकरता मंजूर केलेले शासन निर्णय व अतिरिक्त दोन टक्के प्रोत्साहन भत्ता देण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून या ३ ऑक्टोबर २०२४ च्या निर्णयाची अंमलबजावणी करून फिक्स मानधन वैयक्तिक खात्यात देण्यात यावे अशा पद्धतीचे निवेदन रिसोड तालुका ग्रामरोजगार सहायकांनी रिसोड पंचायत समिति गटविकास अधिकारी ,तहसीलदार रिसोड, कृषी अधिकारी तालुका कृषी अधिकारी कार्यालय रिसोड, यांना निवेदन सादर केले आहे.

सदर निवेदनामध्ये महाराष्ट्र शासनाने एक एप्रिल २०२५ पर्यंत या बाबीची गंभीर दखल घेतली नाही १ एप्रिल पासून महाराष्ट्रातील सर्व ग्राम रोजगार सहाय्यक काम बंद आंदोलनाचा बडगा उभारणार आहेत, सदर निवेदन रिसोड तालुका ग्रामरोजगार सहायकांनी २८ /३ /२०२५ रोजी सादर केले आहे या निवेदनावर रिसोड तालुक्यातील ग्राम रोजगार सहाय्यक नरेंद्र अंभोरे, गजाननराव बाजड, अमोल देशमुख,दीपक सरोदे, गजानन बोरकर, भागवत नरवाडे, संतोष कळासरे, गजानन राऊत, राजकुमार थोरात, केशव हागे, गणेश शिंदे जनार्धन वानखेडे अभिमन्यू भगत संतोष नरवाडे मनीष खडसे कुंडलिक शिंदे,संजय जगदाळे, सुनील मोरे, देवानंद अवचार, भारत गीते, विजय धोडपकर, परसराम इंगळे,गणेश नरवाडे, अशोक तात्या सरकटे, गजानन जाधव, अभिमन्यू भगत, आत्माराम जाधव, गोविंदा लोखंडे, अनंता सानप, प्रभाकर नाईकवाडे, रवी भुतेकर, राजेश शेवाळे, दत्तराव गरकळ यांच्यासह रिसोड तालुक्यातील सर्व ग्राम रोजगार सहायक यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# दत्तक कन्या म्हणून घरी आणलं; निर्दयी दाम्पत्याने चिमुकलीला छळछळ करुन मारले

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यातून धक्कादायक बातमी समोर आली आहे. सिल्लोड तालुक्यातील मुगलपुरा भागात चार वर्षांच्या चिमुरडीचा छळछळ करुन निघृणपणे खून करण्यात आला आहे. एका जोडप्याने दत्तक घेतलल्या चार वर्षांच्या मुलीला हालहाल करुन मारल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पती-पत्नी दोघांनाही अटक करण्यात आली आहे. मृत मुलीचे नाव आयत फईम शेख आहे. तर फईम आणि फौजिया, फईम शेख या पती-पत्नीला पोलिसांनी अटक केली आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार सिल्लोड तालुक्यातील मोगलपुरा भागात राहणाऱ्या फईम आणि फौजिया फईम शेख या दाम्पत्याने आयत या मलीला जालन्यातन पाच हचार रुपयांत खरेदी केलं ३ वर्षाच्या मुलीचा व्यवहार खरेदी-विक्री झाला होता. मात्र शेख दाम्पत्याने तिला दत्तक घेतल्याचा बनाव रचला होता. आयत या चिमुकलीला घरी आणल्यानंतर हे दाम्पत्य तिचा अनन्वित छळ करत होते. या क्रूर पती-पत्नीकडून चिमुरडीला चटके दिले जात होते. जळत्या लाकडाने ते तिच्या शरीरावर चटके देत होते. एवढंच नाही तर क्रूरकर्मा फईम आणि फौजियाने तिचे हात-पाय पिरगळून मोडले होते. तिला डोक्यात आणि पाठीवर बेदम मारहाण केली होती. अमानुष मारहाणीमुळे चिमुरडी



जीवाच्या आकांताने ओरडत होती, मात्र या पती-पत्नीला तिची दया आली नाही. १५ दिवसांची उपासमार आणि अमानुष अत्याचारामुळे चिमुरडीचा मृत्यू झाला. मुलीच्या मृत्यूनंतर कोणालाही याची कानोकान खबर लागू नये आणि आपले पितळ उघडे पडू नये यासाठी फईम आणि फौजिया यांनी गुपचूप तिच्यावर अंत्यसंस्कार करण्याचा प्रयत्न केला.

परंतु पोलिसांनी दफनविधी रोखला चार वर्षांच्या चिमुरडीचा छळ करुन तिचा खून केल्यानंतर फौजिया आणि फईम शेख हे सिल्लोड येथील कब्रस्तानमध्ये तिचा मृतदेह घेऊन गेले. कोणालाही काही न सांगता दफनविधी करण्याची त्यांची तयारी होती, मात्र या मध्ये काहीतरी संशयास्पद असल्याचे लक्षात आल्यानंतर शेजारी असलेल्या लोकांनी या घटनेची माहिती पोलिसांना दिली.

पोलीस कब्रस्तानमध्ये पोहोचले आणि त्यांनी दफनविधी रोखला. चिमुरड्या आयत शेखचा मृतदेह ताब्यात घेऊन पोस्टमॉर्टमसाठी पाठवण्यात आला. यामध्ये चिमुरडीला हालहाल करुन मारण्यात आल्याचे उघड झाले. सिल्लोड शहर पोलिसांनी फौजिया आणि फईम शेख या दोघांना अटक केली आहे. त्यांच्याविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## विविध वृत्त...

### स्वाभिमानीचे प्रशांत डिक्कर यांना जामीन मंजूर, राजकीय द्वेषापोटी खोटे गुन्हे दाखल केल्याचा प्रशांत डिक्कर यांचा आरोप

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा /प्रतिनिधी :** स्थानिक आमदार संजय कुटे यांनी राजकीय द्वेषापोटी ठेकेदारांना हाताशी धरून हे खोटे गुन्हे दाखल केले. ज्या महिलेने पोलिसात तक्रार दिली, त्या महिलेच्या नावावर कुठलीही शेती नाही, म्हणून न्यायालयाने जमीन मंजूर केला. झालेला अन्याय व खोटे गुन्हे दाखल केल्याबद्दल आता उच्च न्यायालयात धाव घेणार.

### कर्जबाजारी शेतकऱ्याची आत्महत्या पाचंबा शेतशिवारातील घटना

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड /प्रतिनिधी :** शेती वरील कर्ज फाइनेंस से होम लोन व बचत गटाचे कर्ज दिवसेंदिवस शेतमालाच्या उत्पन्नामध्ये होत असलेली घट शेतीमालाचे गडगडते भाव व वाढलेला खर्च आसमानी व सुलतानी संकटाचा सामना करत असलेल्या



एका शेतकऱ्याने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना २९ मार्च रोजी सकाळी नऊ वाजता रिसोड तालुक्यातील पाचंबा शेत शिवारामध्ये उघडकीस आली धनंजय जनार्धन गव्हाणे वय ४५ वर्षे रा. पाचंबा ता रिसोड असे मृतकाचे नाव असून याप्रकरणी मृतकाचा आते भाऊ शिवशंकर नवनाथ वानखेडे याने रिसोड पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की धनंजय जनार्धन गव्हाणे वय ४५ वर्षे रा. पाचंबा ता रिसोड याचे वडील नामे जनार्धन यशवंता गव्हाणे यांचे नावावर पाचंबा शेत शिवारात गट नं ८९ प्रमाणे तिन एकर शेती असुन सदर शेतीवर जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा रिसोड यांचे पिक कर्ज असुन सदर शेती माझा आते भाउ नामे धनंजय जनार्धन गव्हाणे वय ४५ वर्षे रा. पाचंबा ता रिसोड हा वहीती करत असुन सदर शेतीवरील पिक कर्ज कसे फेडायचे तसेच त्याचे नावावर महिद्रा फायनेंस कंपनीचे होमलोन व बचत गटाचे कर्ज होते. याच विवंचनेत दिनांक २९ मार्च रोजी सकाळी ०९/०० वा सुमारास त्याचे ग्राम पाचंबा शेतातील उंबराच्या झाडाला दोरीने फाशी घेवुन आत्महत्या केली आहे. सदर घटनेची माहिती रिसोड पोलीस स्टेशनला देण्यात आली असता रिसोड पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक वसंत तहकीक यांनी आपल्या अन्य कर्मचाऱ्यासह घटनास्थळ गाठून मृतदेह रिसोड येथील ग्रामीण रुग्णालयात शवाविच्छेदनासाठी दाखल केला. याप्रकरणी रिसोड पोलिसांनी मर्ग दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

### जीवाला धोका असल्याची तक्रार दिली पण नांदुरा पोलिसांनी दुर्लक्ष केले; दुसऱ्याच दिवशी पुतण्याने कुऱ्हाडीचा घाव घालून काकाला संपवले

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** पोलिसांनी केलेल्या दुर्लक्षितपणामुळे एका व्यक्तीचा जीव गेल्याची घटना बुलढाण्यामध्ये घडली. पुतण्यापासून आपल्या जिवाला धोका असल्याचं एका काकाने पोलिसांना सांगितलं होतं, तशी रितसर तक्रारही केली होती. पण पोलिसांनी केलेल्या दुर्लक्षामुळे दुसऱ्याच दिवशी त्या काकाचा जीव गेला. पुतण्याने काकाला भर दिवसाच कुऱ्हाडीचा घाव घालून संपवल्याची घटना घडली. गोपाल मनोहर बोके (वय ४५) असे मृतकाचे नाव असून शुभम विठ्ठल बोके असे आरोपीचे नाव आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा तालुक्यातील सोनज या गावी पुतण्याने त्याचे काका गोपाल मनोहर बोकेंना, शुक्रवारी (२८ मार्च) जुन्या वादातून मारहाण केली होती. ही मारहाण झाल्यानंतर काका गोपाल मनोहर बोके यांनी नांदुरा पोलिसात तक्रारही दिली होती. मात्र पोलिसांनी कुठली कारवाई न केल्याने शनिवारी सकाळी अगदी त्याच वेळेस तक्रारदाराराची हत्या करण्यात आली.

मृतक गोपाल बोके यांनी कालच नांदुरा पोलिसात माझ्या जीवाला धोका असल्याची तक्रार दाखल केली होती. मात्र पोलिसांनी कुठलीही कारवाई न केल्यामुळे शेतकरी असलेले गोपाल मनोहर बोके यांची हत्या झाली असा आरोप मृतकाच्या कुटुंबीयांनी केली. पोलिसांनी जर तक्रारीची दखल घेतली असती आणि कारवाई केली असती तर ही वेळच आली नसती असा आरोप मृतकाच्या पत्नीने केला. तर या हत्येला फक्त आणि फक्त पोलिसच जबाबदार असल्याचा आरोप मृतकाच्या मुलांनी केला. मृतकांच्या नातेवाईकांनी पोलिस स्टेशन समोरच ठिय्या दिला आहे. या प्रकरणात नांदुरा पोलिसांनी २४ तास आधी तक्रार केल्यावरही कारवाई करण्यास दिरंगाई केल्याने पोलिस हे गुन्हेगार असल्याचा आरोप करण्यात आला.

त्यामुळे या प्रकरणात पोलिसांना सहआरोपी करावे अशी मागणीही करण्यात येत आहे.

# मेहकर पंचायत समिती वार्षिक आमसभा जल जीवन मिशन योजनेच्या प्रश्नावर गाजली

## सात वर्षानंतर झालेल्या सभेत अनेक प्रश्नांना न्याय







दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी : ग्रामीण भागाच्या विकासाची प्रश्न आणि स्थानिक समस्या सोडवण्यासाठी तब्बल सहा वर्षांनी २९ मार्च रोज पंचायत समिती सभागृहात आमसभा आयोजित करण्यात आली होती. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या आमसभेत मतदार संघातील जलजीवन मिशनचा प्रश्न चांगलाच गाजला असून तालुक्यातील ९२ गावांमध्ये सुरू असलेल्या जलजीवन विषयांच्या कामाची पोलखोल या आमसभेत झाली आहे.**

सभेला केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव. मेहकर लोणार मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात, माजी. आमदार संजय रायमुलकर, माधवराव जाधव ,सुरेश तात्या वाळूकर, आशिष राहटे, बळीराम मापारी, अरुण दळवी, संतोष धनतोंडे, निंबाजी पांडव, दत्ता पाटील, किशोर गारोळे, गिरधर पाटील अनंतराव वानखेडे, सेवादल काँग्रेसचे शैलेश बावस्कर, ड. आकाश घोडे, अ.मोरे ,भास्करराव ठाकरे, सारंग माळेकर, डॉ.सार्थ खरात, ड संदिप गवई, जिजाताई चांदेकर स्वातीताई नवले, संदीप गवई, गजानन सावंत, साहेबराव मोरे, यांचा सह अनेक मान्यवर उपस्थित होते. पंचायत समितीचे गटविकास अधिकारी डॉ. उमेश देशमुख, सहाय्यक गटविकास अधिकारी धीरज जाधव, तहसीलदार मडके, विस्तार अधिकारी शिवाजी गवई, पंडागळे साहेब, विस्तार अधिकारी संदीप मेटांगळे, सांख्यिकी विस्तार अधिकारी जे.डी.जाधव, एस. के. पवार, जी. तपासे, कृषी अधिकारी परिहार, अभियंता डी. बी. राठोड, अभियंता विजय राठोड, प्रवीण गायकवाड, श्रीमती जे.डी पवार, श्रीमती जी. के .काळदाते, कनिष्ठ सहाय्यक श्री.डोके, वरिष्ठ सहाय्यक श्री. काटे, श्रीमती अहिरे, श्रीमती वानखेडे, श्रीमती राजपूत, श्रीमती शेळके, आदी उपस्थित होते. तर, तालुक्यामधील मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत एकून सात शाळेला पुरस्कार प्राप्त झाले असल्याने प्रथम क्रमांक.जिजामाता हायस्कूल हिवरा खुर्द.११ लाख रुपये, जि. प. शाळा पिंपरी माळी ५ लाख



रुपये, अंजनी बु. ३ लाख रुपये, जि. प. शाळा घाटबोरी २ पेनटाकळी १ लाख पारितोषिक मिळवल्याबद्दल सर्व शाळांचे मुख्याध्यापकांचा सत्कार करण्यात आला. तसेच तालुक्यातून स्मार्ट ग्रामपंचायत मध्ये मुंदेफळ, लोणी गवळी असल्याने त्या गावातील सरपंच,सचिव यांचे सुद्धा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सभेच्या सुरुवातीला गटविकास अधिकारी यांनी मान्यवराचे सत्कार करून वार्षिक आढावा सादर केला. अनेक प्रश्नांच्या प्रश्न उत्तरात जल जीवन मिशन व पाणी टंचाई सभेचे आकर्षण बनले. अनेक गावात जनजीवन मिशन अपूर्ण असून मोठ्या प्रमाणात गावामध्ये पाण्याचा प्रश्न उपस्थित झालेला दिसला. बांधकाम,घरकुल विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग,मनरेगा स्वच्छ भारत अभियान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना, राष्ट्रीय बायोगॅस व खत विकास कार्यक्रम, पशुसंवर्धन विभाग, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान, यांच्या प्रमुखांनी योजनेची वार्षिक अहवाल सादर केले. जल जीवन मिशन कागदावरच असल्याचे दिसून आले.जल जीवन मिशनच्या अधुऱ्या निधीमुळे बरेच गावांमध्ये बारगळली जलजीवन मिशन मंत्र्यांनी जलजीवन विषयी दिली माहिती.

सदर आम सभा ही नागरिकांचा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न असलेल्या जल जीवन मिशन योजने संदर्भात चांगलीच गाजली. याबाबत आमदारांनी लोकप्रतिनिधींनी अधिकाऱ्यांना धारेवर धरत जाब विचारला. तर, जलजीवन मिशन संदर्भात माहिती देताना अधिकाऱ्यांची बोबडी वळल्याचे दिसून आले. एकंदरीत तालुक्यातील जल जीवन मिशन संदर्भात लोकप्रतिनिधींनी अधिकाऱ्यांना धारेवर धरत जल जीवन मिशन योजनेची पोलखोल केली.

### अधिकाऱ्यांचा अपयश लपविण्याचा केविलवाना प्रयत्न

आमदार सिद्धार्थ खरात यांची माध्यमांशी बोलताना प्रतिक्रिया मेहकर तालुक्यातील विविध समस्या बाबत आज २९ मार्च रोजी आमसभा संपन्न झाली. तब्बल सात वर्षानंतर हम सभा घेण्यात आली असून या आमसभेत विविध विषयावर चर्चा करण्यात आली आहे.अशी माहिती मेहकर लोणार मतदार संघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ती पुढे म्हणाले की, सण २०१८ नंतर सात वर्षा च्या कालावधी आज पहिल्यांदा आम सभा झाली असून या आमसभेत विविध विषयावर चर्चा करण्यात आली आहे.या आमसभेत अनेक अडचणी निवडण्यासंदर्भात संधी दिली होती. मतदार संघात तालुक्यातील सरपंचांनी उपस्थिती लावली होती. विशेष करून जलजीवन मिशन योजना घरकुल योजना व सिंचनविधी यासंदर्भात नागरिक आग्रही असल्याचे दिसून आले.या संदर्भात चर्चा सुद्धा झाली ग्रामसेवक सरपंच ग्रामरोजगार सेवक यांच्या विषयावरील चर्चा झाली मेहकर तालुक्यात ९२ गावातील योजना सुरू आहेत.११३ गावात पाणी पुरवठा करण्यात येत असल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात मात्र सहा गावांना पाणीपुरवठा होतो की नाही हा प्रश्न आहे. अधिकारी आपले अपयश लपविण्यासाठी हा केविलवाणी प्रयत्न करीत आहेत. तालुक्यातील समस्या निवारण्यासाठी ३० दिवसानंतर मी स्वतंत्र बैठक लावली असून योजना निहाय आढावा घेण्यात येणार आहे. यामध्ये विविध योजना प्रशासकीय मान्यता कामास प्रारंभ व आजची कामाची स्थिती काय याबाबत सविस्तर माहिती घेण्यात येणार आहे. त्याचबरोबर ज्या योजना खरोखर आर्थिकदृष्ट्या अडचणीमुळे रखडले आहेत. त्यांना सहकार्य करण्यात येईल व ज्या योजना केवळ कंत्रालदाराचा आर्थिक हेतू समोर ठेवून काम केल्या जात आहे. त्याची सखोल चौकशी करण्यात येईल असे मतही यावेळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी व्यक्त केले.

### रायपूर येथे भंगारच्या दुकानाला भीषण आग, आगीवर तात्काळ नियंत्रण मिळवल्याने मोठा अनर्थ टळला

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा /प्रतिनिधी :** बुलढाणा तालुक्यातील रायपूर येथे भंगारच्या दुकानाला अचानक आग लागल्याची घटना घडली, ज्यामध्ये धुरांचे मोठे लोट पाहायला मिळाले, बुलढाणा चिखली येथील अग्निशमन विभागाने तात्काळ घटनास्थळी दाखल होत आगीवर नियंत्रण मिळवले, या भंगार दुकानच्या शेजारीच पेट्रोल पंप आणि काही घरे देखील आहेत, अग्निशमन विभागाला आग विजवण्यासाठी वेळ लागला असता तर मात्र मोठा अनर्थ घडला असता. यामध्ये भंगार दुकानदारांचे मोठं नुकसान झाल आहे, शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची प्राथमिक माहितीमिळतआहे.



# पो. स्टे बिटरगांव हद्दीतील घरफोडी मधील आरोपीला कंधार जिल्हा नांदेड मधून घेतले ताब्यात

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** पोलीस स्टेशन बिटरगांव अप क्रमांक ८४/२०२५ कलम ३०५ भान्यासं या गुन्हयातील चोरी करणाराऱ्या आरोपी नागनाथ जायभाय ला पुढील तपास करिता पोलीस स्टेशन बिटरगांव यांच्या ताब्यात दिले.

दिनांक २८/०३/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा पथक यवतमाळ कॅम्प पुसद हे अ उघड गुन्हे मधील आरोपी शोध व माहीती काढत असतांना गुप्त बातमीदाराव्दारे माहीती मिळाली कि, पोलीस स्टेशन बिटरगांव अप क्रमांक ८४/२०२५ कलम ३०५ भान्यासं हा गुन्हा आरोपी नागनाथ जायभाय यांनी केला असून तो मौजे बोरी (खुर्द) ता. कंधार जि.नांदेड येथील असल्याचे तसेच तो त्याचे गावी बोरी (खुर्द) ता. कंधार जि. नांदेड येथे असल्याबाबत गोपनिय माहीती मिळाल्याने सदर गुन्हयातील आरोपी शोध कामी मौजे बोरी (खुर्द) ता. कंधार जि. नांदेड येथे नमूद पोलीस पथक रवाना होवून सदर ठिकाणी जावून पोलीस कौशल्याचा व तांत्रीक माहीती काढून आरोपी नामे नागनाथ संग्राम जायभाय वय २१ वर्ष रा.बोरी (खुर्द) ता. कंधार जि.नांदेड यास ताब्यात घेवून पोलीस कौशल्याचा वापर करुन त्याचेकडे पोलीस स्टेशन बिटरगांव अप क्रमांक ८४/२०२५ कलम ३०५ भान्यासं या गुन्हयातील चोरीस गेलेल्या १४ ग्रॅम सोन्याचे दागिने बाबत विश्र्वासात घेवून विचारपुस केली असता त्याने गुन्हा केला असल्याचे कबूल केल्याने व नमूद पथकांची खात्री झाल्याने आरोपी नामे-नागनाथ संग्राम जायभाय वय २१ वर्ष रा.बोरी (खुर्द) ता. कंधार जि. नांदेड यास ताब्यात घेवून पुढील तपास कामी पोलीस स्टेशन बिटरगांव यांच्या ताब्यात दिले.

सदरची कारवाई मा पोलीस अधीक्षक यवतमाळ श्री. कुमार चिंता सा, मा. अपर पोलीस अधीक्षक यवतमाळ श्री.पियुष जगताप सा, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. हनुमंत गायकवाड सा, मा. पोलीस निरीक्षक श्री. सतीश चवरे स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांचे मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक गजानन गजभारे, पोउपनि/शरद लोहकरे, चापोउपनि रविंद्र शिरामे, पोहवा/संतोष भोरगे, पोहवा/तेजाब रणखांब, पोहवा/सुभाष जाधव, पोहवा रमेश राठोड, पोहवा/कुणाल मुंडोकार, पोशि/सुनिल पंडागळे, सर्व नेम-स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

